| | |
|---|---|
| २ | **राज्य / राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना वेतनवाढीबाबतची कार्यवाही.** |
| | १. राष्ट्रीय / राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना पुरस्कार जाहीर झाल्याच्या दिनांकापासून दोन आगाऊ वेतनवाढी देण्याची राज्य शासनाची योजना कार्यान्वित आहे. जे शिक्षक त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेपर्यंत पोहोचले असतील अशा शिक्षकांना त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेच्या अगोदरच्या वेतनवाढीच्या ४८ पट ठोक रक्कम देण्यात येते. वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेच्या एक टप्पा अगोदर वेतन घेणाऱ्या शिक्षकांना एक आगाऊ वेतनवाढ आणि वेतनवाढीच्या २४ पट ठोक रक्कम देण्यात येते. तसेच, जे शिक्षक, पुरस्कार जाहीर झालेल्या दिनांकापूर्वी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असतील अशा पुरस्कारप्राप्त शिक्षकांना / मुख्याध्यापकांना अनुक्रमे रुपये ३,०००/- व रुपये ५,०००/- ठोक रक्कम देण्यात येते. |
| | २. राष्ट्रीय / राज्य शिक्षक पुरस्कार प्रत्यक्ष समारंभात प्रदान झाल्यानंतरच वरील मुद्दा क्रमांक १ चे अवलोकन करुन त्यानुसार प्रस्ताव या कार्यालयास सादर होणे अत्यावश्यक आहे. |
| | ३. सदरचा प्रस्ताव हा संबंधित शिक्षक / मुख्याध्यापक ज्या शाळेत कार्यरत आहे त्या शाळेतील अनुक्रमे शिक्षकांच्या बाबतीत मुख्याध्यापकाने व मुख्याध्यापकांच्या बाबतीत संस्थाप्रमुखाने त्यांच्या शिफारशीसह व सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेसह प्रस्ताव त्यांच्या शिफारशीसह शाळा ज्या जिल्ह्यात आहे त्या जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांचेमार्फत या कार्यालयास आवश्यक त्या कागदपत्रांसह प्राप्त होणे आवश्यक आहे. |
| | **प्रस्तावासाठी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे** |

| | |
|---|---|
| १ | राष्ट्रीय / राज्य शिक्षक पुरस्कार व थोर समाजसुधारक सावित्रीबाई फुले “आदर्श शिक्षिका पुरस्कार’ प्राप्त झाल्याबाबत शासनपत्र व प्राप्त प्रमाणपत्राची साक्षांकित झेरॉक्स प्रत प्रस्तावासोबत द्यावी. |
| २ | राष्ट्रीय / राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना पुरस्कार जाहीर झाल्याच्या दिनांकापासून दोन आगाऊ वेतनवाढी देण्याची राज्य शासनाची योजना कार्यान्वित आहे. त्यामुळे शासन निर्णय ज्या दिनांकास जाहीर होतो त्या महिन्याचा संबंधितांचा वेतनाचा दाखला सोबत जोडावा. |
| ३ | पुरस्कारा प्रित्यर्थ आगावू दोन वेतनवाढी मंजूर करावयाच्या असल्याने संबंधितांच्या वेतनाबाबत व वेतनवाढीबाबत विहीत नमुन्यातील वेतनवाढीच्या फॉर्म मधील माहिती सोबत सही शिक्क्यासह देण्यात यावी. |
| ४ | राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक / शिक्षीकेने त्यांना रेल्वे भाड्यात सवलत मिळणेकामी प्राप्त करुन घ्यावयाच्या ओळखपत्रासाठी विहीत नमुन्यात ओळखपत्र तयार करुन ते दोन प्रतीत प्रस्तावासोबत जोडावे. (सोबत नमुना जोडला आहे.) |